दि. १७ जानेवारी २०२६
शनिवार
वर्ष ४ थे
अंक ८०
किंमत २ रूपये
पृष्ठे ४
लातूर
RNINO.MHMAR/25/A1409

# दैनिक अदिती एक्सप्रेस

संपादक - गंगाधर अभंग डिगोळे उपसंपादक : डॉ. ज्ञानेश्वर विठ्ठल कल्याणे
ईमेल-aditiexpress33@gmail.com, Website: www.aditiexpress.in

### आजचे पंचाग

- दिनांक : १७ जानेवारी २०२६
- वार : शनिवार
- माह (अमावस्यांत) : पौष
- माह (पूर्णिमांत) : माघ
- ऋतु : शिशिर
- आयन : उत्तरायण
- पक्ष : कृष्ण पक्ष
- तिथी : द्वादशी तिथी (रात्री ०८:१६ पर्यंत) त्यानंतर त्रयोदशी तिथी
- नक्षत्र : ज्येष्ठा नक्षत्र (१६ जानेवारी पहाटे ०५:४७ पर्यंत) त्यानंतर मूळ नक्षत्र
- योग : वृद्धि योग (रात्री ०८:३७ पर्यंत) त्यानंतर ध्रुव योग
- करण : तैतुला करण (रात्री ०८:१६ पर्यंत) त्यानंतर गराजा करण
- चंद्र राशी : वृश्चिक राशी (१६ जानेवारी पहाटे ०५:४७ पर्यंत) त्यानंतर धनु राशी
- सूर्य राशी : मकर राशी
- अशुभ मुहूर्त:
- राहु काळ : दुपारी ०२:११ ते दुपारी ०३:३४ पर्यंत
- शुभ मुहूर्त:
- अभिजित : दुपारी १२:२६ ते दुपारी ०१:१०
- सूर्योदय : सकाळी ०७:१६
- सूर्यास्त : सायंकाळी ०६:२०
- संवत्सर : विश्वावसु
- संवत्सर(उत्तर) : सिद्धार्थी
- विक्रम संवत: २०८२ विक्रम संवत
- शक संवत: १९४७ शक संवत

# भाजपची राज्यात मोठी ‘लाट’

## ९०० हून अधिक जागांवर सर्वात मोठ्या पक्षाची झेप; ठाकरेंचा बालेकिल्ला ढासळला



मुंबई - राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महासंग्रामाचा आज निकाल जाहीर होत असून, संपूर्ण महाराष्ट्रात ‘कमळ’ जोमाने फुलल्याचे चित्र दिसत आहे. आतापर्यंत हाती आलेल्या कलानुसार, भारतीय जनता पक्षाने (BJP) राज्यात ऐतिहासिक मुसंडी मारली असून ९०५ जागांवर आघाडी घेत आपला क्रमांक एकचा दर्जा राखला आहे. दुसरीकडे, शिवसेनेचा अभेद्य बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या छत्रपती संभाजीनगरमध्ये भाजपने शिवसेनेच्या दोन्ही गटांना धूळ चारत भगव्या गडावर ‘निळा’ आणि ‘केसरी’ झेंडा फडकवला आहे.

भाजपची मोठी झेप

राज्यातील २९ महापालिकांच्या मतमोजणीत भाजपने सुरुवातीपासूनच मोठी आघाडी घेतली आहे. महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या मदतीने भाजपने अनेक शहरांत विरोधकांचा सुपडा साफ केला आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवसेनेचा ‘बाण’ अडकला!

सर्वात मोठा उलटफेर छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत पाहायला मिळत आहे. दशकानुदशके शिवसेनेचा गड राहिलेल्या या शहरात यावेळी भाजपने सुरुंग लावला आहे. भाजपचे उमेदवार सध्या २३ जागांवर आघाडीवर असून त्यांनी महापौरपदाच्या दिशेने पाऊल टाकले आहे.

संभाजीनगरमधील धक्कादायक आकडेवारी:

भाजप: ३५ जागा (आघाडी)

एमआयएम: १६ जागा (आघाडी)

शिवसेना (शिंदे गट): १५ जागा (आघाडी)

शिवसेना (ठाकरे गट): ०८ जागा (आघाडी)

वंचित बहुजन आघाडी: ०४ जागा (आघाडी)

काँग्रेस: ०३ जागा (आघाडी)

छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवसेना शिंदे गटाचे ताकदवान नेते आणि मंत्री संजय शिरसाट तसेच खासदार संदीपान भुमरे यांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. मात्र, मतदारांनी दिलेला कौल पाहता या नेत्यांना मोठा झटका बसला आहे. दुसरीकडे, असदुद्दीन ओवेसी यांच्या एमआयएमने १५ जागांवर आघाडी घेत मोठी मुसंडी मारली आहे. उद्धव ठाकरे यांच्यासाठी हा निकाल अत्यंत क्लेशदायक ठरला **(पान २ वर)**

# शरद पवारांना मोठा हादरा

## अनेक शहरांत तुतारी फैल; काकापेक्षा पुतण्या सरस

मुंबई : राज्यातील २९ महानगरपालिकांच्या महासंग्रामाचा आज निकाल जाहीर होत असून, संपूर्ण महाराष्ट्रात ‘कमळ’ जोमाने फुलल्याचे चित्र दिसत आहे. आतापर्यंत हाती आलेल्या कलानुसार, भारतीय जनता पक्षाने (इगझ) राज्यात ऐतिहासिक मुसंडी मारली असून ९०५ जागापेक्षा आघाडी घेतली पण सगळ्यात मोठा धक्का म्हणजे शरद पवार यांना लागल आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाचे एकेकाळी केंद्रबिंदू मानल्या जाणाऱ्या शरद पवार यांच्या गटासाठी महाराष्ट्राच्या महानगरपालिकेच्या निवडणुकीचे निकाल चांगली बातमी घेऊन आलेले नाहीत.

मतमोजणीनंतरही शरद पवार यांचा पक्ष, राष्ट्रवादी-सपा, कुठेही चांगली कामगिरी करताना दिसत नाही. राज्यातील २,१०० वॉर्डमधील ट्रेंडनुसार शरद पवार यांचा पक्ष केवळ २७ जागावर आहे. पक्षासाठी ही अतिशय निराशाजनक कामगिरी आहे. राज्यात अशी अनेक शहरे आहेत जिथे राष्ट्रवादी काँग्रेस



पक्ष शरदचंद्र पवार यांना अद्याप खातेही उघडता आलेले नाही.

राज्यातील सर्वात मोठी महानगरपालिका असलेल्या मुंबईत राष्ट्रवादी-शपाचे खाते उघडले नाही आहे. बीएमसीकडे २२७ वॉर्ड आहेत, परंतु शरद पवारांना खातेही उघडता आले नाही आहे आहे. मुंबईच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक प्रतिमेचा विचार करता हा राष्ट्रवादी-शपाला मोठा धक्का आहे. ठाणे आणि मीरा भाईंदरमध्ये पक्ष प्रत्येकी चार जागांवर आघाडीवर आहेत. तथापि, पुणे, कल्याण, नवी मुंबई, उल्हासनगर, वसई-विजय नगर यासारख्या शहरांमध्ये राष्ट्रवादी-सपाला त्यांचे खातेही उघडता आले नाही.

जळगाव, धुळे, इचलकरंजी, नांदेड, परभणी, जालना, चंद्रपूर, अमरावती, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक आणि पनवेल ही राज्यातील अशी शहरे आहेत जिथे शरद पवार यांच्या पक्षाच्या एकाही उमेदवाराला आघाडी मिळालेली नाही. या निवडणुकीत शरद पवारांचा पक्ष पराभूत होत असल्याचे दिसून येत असले तरी, **(पान २ वर)**

# मतचोरी हे राष्ट्रविरोधी कृत्य.; महाराष्ट्र निवडणूक आयोगावर राहुल गांधींचा निशाणा

नवी दिल्ली : राज्यातील महापालिका निवडणुकांचे निकाल जाहीर होत आहे. गेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांप्रमाणेच महापालिका निवडणुकांध्ये भाजपने मुसंडी मारली आहे. मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड यांसारख्या महत्त्वाच्या महापालिकांवर भाजप विजयाकडे वाटचाल सुरू केली आहे. पण या सर्व निकालांवर लोकसभेचे विरोधी पक्षनेते आणि खासदार राहुल गांधी यांनी जोरदार हल्लाबोल करत संताप व्यक्त केला आहे.



महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या मतदानादरम्यान बोटावरील शाई सहजपणे पुसून टाकली जात असल्याच व्हिडीओ समोर आला. यावरून राहुल गांधी यांनी याला लोकशाहीची थट्टा असल्याची टिका केली आहे. तर त्याचवेळी निवडणूक आयोगाने मात्र या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन चौकशीचे आदेश दिले आहे.

महाराष्ट्रातील महारापालिका निवडणुकांमध्ये वापरल्या जाणाऱ्या शाईच्या गुणवत्तेबाबत राज्यभरातील मतदारांकडून प्रश्न उपस्थित केले गेले. हे प्रकरण आता राष्ट्रीय स्तरावर पोहचले आहे. राहुल गांधी यांनी ट्विटर एक्स वर प्रतिक्रीया देताना निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले. निवडणूक आयोग नागरिकांची दिशाभूल करत आहे. लोकशाहीवरील जनतेचा विश्वास उडत चालला आहे. मतचोरणे हा देशविरोधी कायदा आहे. अशी टिका राहुल गांधी यांनी केली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका सह महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका संस्थांसाठी गुरुवारी मतदान झाले. मतदान प्रक्रिया सुरू असतानाच मतदान केलेल्या मतदाराच्या बोटावरील शाई एसीटोन किंवा इतर रसायनांनी सहजपणे पुसली जाते, असे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होऊ लागले. यावरून शाई पुसून बोगस मतदार वारंवार मतदान करू शकतात, असा आरोप विरोधकांकडून होऊ लागला. बोगस मतदार अशा प्रकारे वारंवार फसवे मतदान करू शकतात, जर शाई कायमची नसेल तर त्यामुळे फसव्या मतदानाची शक्यता वाढते, **(पान २ वर)**

# कोण होणार मुंबईचा नवा महापौर?‘या’ नावाची आहे चर्चा

मुंबई - राज्यातील २९ महापालिकांचे निकाल जाहीर होत आहे. संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या मुंबई महापालिकेत भाजपने ऐतिहासिक विजयाकडे वाटचाल सुरू केली आहे. मुंबई महापालिकेवर भाजपचीच सत्ता येणार हे जवळपास निश्चित झाले आहे. पण त्याचवेळी मुंबई महापालिकेचा महापौर कोण होणार,याबाबतही आता राजकीय वर्तुळासह राज्यभरात चर्चा सुरू झाली आहे. या सगळ्यात एका नावाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

मुंबई महानगरपालिका (बीएमसी) निवडणुकीत भाजपच्या उमेदवार तेजस्वी घोसाळकर यांनी दणदणीत विजय मिळवला. घोसाळकर यांनी मुंबईतील दहिसर वॉर्ड क्रमांक २ मधून निवडणूक यशस्वीरित्या जिंकली. या विजयानंतर, आता त्यांना मुंबईच्या महापौरपदासाठी संभाव्य उमेदवार मानले जात आहे. निवडणुकीच्या सुमारे एक महिना आधी तेजस्वी घोसाळकर यांनी शिवसेना (ठाकरे गट) सोडून भारतीय जनता पक्षात प्रवेश केला होता.



सूत्रांनुसार, तेजस्वी यांची वाढती लोकप्रियता, जनसमर्थन आणि मजबूत राजकीय प्रभावामुळे त्यांना महापौरपदासाठी एक मजबूत दावेदार बनवले आहे. तेजस्वी घोसाळकर या शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार विनोद घोसाळकर यांच्या सूनबाई आहेत. तेजस्वी घोसाळकर यांनी २०१७ च्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेनेच्या (तेव्हाची अविभाजित शिवसेना ) तिकिटावर विजय मिळवला होता. तेव्हापासून त्या राजकारणात सक्रिय आहेत. पण तेजस्वी यांचे पती अभिषेक घोसाळकर यांची २०२२ मध्ये फेसबुक लाईव्ह दरम्यान गोळ्या घालून हत्या करण्यात आली. या हत्येमुळे महाराष्ट्रात खळबळ उडाली आणि राजकीय वर्तुळात त्याचे पडसाद उमटले.

**(पान २ वर)**

# लातूर महानगरपालिका निवडणुकीतील काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या ऐतिहासीक विजय

लातूर प्रतिनिधी : लातूर महानगरपालीका निवडणुकीत काँग्रेस आणि वंचित बहूजन आघाडीने ७० पैकी तब्बल ४७ जागा जिंकून ऐतिहासिक विजय मिळवला आहे, या सर्व विजयाचे श्रेय लातूरकरांचे आहे यामुळे त्यांचे मनपुर्वक आभारी असल्याचे नमूद करुन लातूरकरांनी दाखवलेला हा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी निवडूण आलेल्या सहकाऱ्यासह आम्ही सर्वजण कायम प्रयत्नशील राहणाार असल्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे.





लातूर महानगरपालीका निवडणुकीत काँग्रेस आणि वंचित बहूजन आघाडीला भरघोस यश मिळालेले असतांना या निवडणुकीच्या प्रचाराची एकहाती धुरा सांभाळणारे काँग्रेस पक्षाचे नेते माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे की, लातूरची जनता शांत, सुसंस्कृत आणि विकासाभिमुख असल्याचे पून्हा एकदा सिध्द झाले आहे. महायुतीमधील भारतीय जनता पक्ष आणि इतर घटक पक्षाच्या मंडळीनी इतर शहराप्रमाणे लातूरमध्ये येवून वादग्रस्थ वकतव्य केली, अफवा पसरवून समाजासमाजात व्देष पसरवून फुट पाडण्याचे प्रयत्न केले. येथील जनतेने हे सर्व प्रयत्न उधळून लावल्याचे स्पष्ट झाले आहे. लातूर हे विविधतेने नटललेले सामाजिक एकोपा जपणारे शहर आहे. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने वंचित बहूजन आघाडी सोबत शहराच्या वैशिष्टयाला अनुरुप ठरणारी आघाडी केली. ही आघाडी लातूरकरांना मनपासुन पसंद पडल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे.

आदरणीय शिवराज पाटील चाकूरकर, आदरणीय शिवाजीराव पाटील निलंगेकर, आदरणीय विलासराव देशमुख साहेब या नेत्यांनी लातूरचे हे वेगळेपण जोपासत विकास प्रक्रीयेला गती दिली आहे. आदरणीय दिलीपराव देयामुख साहेब यांच्या नेतृत्वात आणि ते काम पूढे नेण्याचा प्रयत्न करीत आहोत. असे असतांना येथील आदरणीय नेत्याच्या आठवणी पूसण्याचे वक्तव्य करण्याचे धाडस भाजपच्या नेते मंडळींनी केले. त्यांनाही लातूरच्या जनतेने या निकालातून योग्य संदेश दिला आहे.

लातूर हे मराठवाडयात अत्यंत गतीमान पध्दतीने विकसीत होत असलेले शहर आहे. या विकास प्रक्रीयेला बळकटी देणारा जनतेच्या सुचना घेवून तयार केलेला पंचसुत्री जाहीरनामा काँग्रेस आणि वंचित बहूजन आघाडीने या निवडणुकीत जनतेसमोर ठेवला. जनतेकडून या जाहीरनामाला उस्फुर्त प्रतिसाद मिहाळा असून त्यांची कालबध्द अमंलबजावणी करण्याचे आम्ही ठरवले असल्याचे आमदार देशमुख यांनी म्हटले आहे.

लातूर महानगरपालीका निवडणुकी दरम्यान काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आदरणीय मल्लीकार्जून खरगे, **(पान २ वर)**

# पुणेकरांनी मोडली ‘दादागिरी’; अजित पवार झाले ‘फ्री’

पुणे - महानगरपालिकेमध्ये पुन्हा एकदा भाजपचे निर्विवाद वर्चस्व पाहायला मिळत आहे. भाजपने पुणे महानगरपालिकेवर कमळ फुलवले आहे. पुण्यात भाजपने बहुमत गाठले आहे. अजित पवारांनी पुण्याची निवडणूक अत्यंत रंगतदार केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस विरुद्ध अजित पवार यांच्यात हा सामना पाहायला मिळाला. अजित पवार यांनी दिलेली आश्वासने पुणेकरांनी नाकारली असल्याचे चित्र दिसून येत आहे. दरम्यान अजित पवार यांचा पुण्यात सुपडासाफ होताना दिसून येत आहे.

पुणेकरांना मोफत मेट्रो प्रवास देण्याचे वचन अजित पवारआणि आपल्या जाहीरनाम्यात दिले होते. त्यानंतर देखील पुणेकरांनी भाजपच्या बाजूने कौल दिल्याचे दिसून येत आहे.



केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी अजित पवारांना धोबीपछाड दिल्याचे म्हटले जात आहेत. दरम्यान अजित पवारांचा पुण्यात पराभव कशामुळे झाला असे याबाबत काही कारणे समोर येत आहेत.

पुण्यात भाजपचा ठरला मोठा पक्ष

पुणे महापालिकेसाठी भाजप आणि शिवसेना व अजित पवार व शरद पवार यांच्या पक्षाची युती झाली होती. गेल्या काही वर्षांनी महापालिका निवडणूक होत असल्याने निवडणूक अत्यंत चुरशीची झाली. महापालिका जिंकण्यासाठी अजित पवार पुण्यातच ठाण मांडून बसले होते. मात्र मुख्यमंत्री फडणवीस आणि मुरलीधर मोहोळ यांच्यासमोर त्यांचा सपशेल पराभव होताना दिसून येत आहे.

पुणे महानगरपालिकेत भाजपने १२५ जागा जिंकण्याचा विश्वास व्यक्त केला होता. दरम्यान भाजपने यंदाचा प्रचार विकास, वाहतूक कोंडी सोडवणे, नदी संवर्धन आणि अन्य गोष्टींवर केला. खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात २ तए प्रचारसभा घेतल्या. त्यांनी **(पान २ वर)**

# लातूर महानगरपालिका निवडणुकीत ऐतिहासिक विजयाच्या शिल्पकार ठरल्या भाजपाच्या अदिती अजित पाटील कव्हेकर

लातूर - लातूर महानगरपालिके चया निवडणुकीमध्ये ७० पैकी २२ जागेवर भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांना विजय मिळालेला आहे तर इतर जागेवर काँग्रेसला विजय मिळाला असला तरी भाजपाच्या विजयी झालेल्या उमेदवारांमध्ये प्रभाग १८ मधून (क) मध्ये असलेल्या एकूण मतापैकी ५०६४ मते घेऊन देदिप्यमान यश मिळविण्याचे काम अदिती अजित पाटील कव्हेकर यांनी केलेले आहे. यामध्ये त्यांच्या विरोधात उभारलेल्या काँग्रेसच्या सुंदर पाटील कव्हेकर या उमेदवाराला २२३० मतदान मिळालेले आहे तर अदिती अजित पाटील कव्हेकर या २८३४ एवढे मताधिक्य घेऊन ऐतिहासिक



मताधिक्याने निवडून आलेल्या आहेत. त्यामुळे कव्हेकर परिवारांतून राजकीय क्षेत्रामध्ये उतरलेल्या अदिती पाटील कव्हेकर यांचे प्रभाग १८ सह शहरभरातून कौतुक होत आहे.

भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या पत्नी व भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा प्रतिभाताई पाटील कव्हेकर यांच्या सुनबाई या पहिल्यांदाच महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या माध्यमातून निवडणुकीत उतरल्या आणि २८३४ एवढ्या मताधिक्याने विजयी झालेल्या आहेत. प्रभाग ४-अ, ४-ब, व ४-क मधून काँग्रेस व वंचित बहुजन विकास आघाडीच्या उमेदवारांना चांगले मताधिक्य मिळाले असले तरी भारतीय जनता पार्टीच्या २२ विजयी उमेदवारांमधून प्रभाग १८ च्या विजयी उमेदवार अदिती अजित पाटील कव्हेकर यांना एकूण १२४७५ मतापैकी ५०६४ **(पान २ वर)**

## महाराष्ट्राचा विवेकी आवाज; प्रा डॉ एन डी पाटील

फुले, शाहू, आंबेडकरी विचारांचा पुरोगामी वारसा चालवणारे सत्यशोधक विचारवंत प्रा डॉ एन डी पाटील यांचा आज चौथा स्मृतिदिन. चार वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे १७ जानेवारी २०२२ रोजी प्रा डॉ एन डी पाटील यांचे निधन झाले होते. प्रा डॉ एन डी पाटील यांचे पूर्ण नाव नारायण ज्ञानदेव पाटील असे असून त्यांचा जन्म १५ जुलै १९२९ रोजी सांगली जिल्ह्यातील नागाव मधील ढवळी येथे एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. घरची परिस्थिती गरिबीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी पुणे विद्यापीठातून अर्थशास्त्रातून एम ए आणि एल एल बी चे शिक्षण घेतले.

प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९५४ ते १९५७ या कालावधीत सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये अध्यापनाचे कार्य केले. याशिवाय त्यांनी कमवा आणि शिका योजनेचे रेक्टर म्हणूनही काम पाहिले. १९६० साली ते इस्लामपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. कर्मवीरांच्या विचारातून प्रेरणा घेऊनच त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. शिवाजी विद्यापीठाचे पहिले सल्लागार म्हणूनही त्यांनी काम पाहिले. ( १९६२ ) त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी १९७६ ते १९७८ या कालावधीत शिवाजी विद्यापीठात समाजशास्त्र विभागाचे डीन म्हणूनही काम पाहिले. याचबरोबर १९९१ साली त्यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील हे १९५९ पासून रयत शिक्षण संस्थेचे कौन्सिल मॅनेजमेंट सदस्य म्हणून कार्यरत होते. १९९० साली रयत शिक्षण संस्थेच्या चेअरमनपदी त्यांची नियुक्ती झाली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाचा आगळा वेगळा ठसा उमटवला.

शैक्षणिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्य कर्तुत्वाने वेगळा ठसा उमटवला. १९४८ साली त्यांनी शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. त्यानंतर १९५७ साली त्यांनी मुंबईतील गिरणी कामगारांच्या संघटनेचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेत १८ वर्ष सदस्य म्हणून काम केले. १९७८ ते १९८० या काळात ते महाराष्ट्राचे सहकार मंत्री होते. १९८५ साली ते कोल्हापूर मतदार संघातून विधानसभेचे सदस्य म्हणूनही निवडून गेले. १९९९ ते २००२ या काळात ते लोकशाही आघाडी सरकारचे निमंत्रक होते.

आपले आयुष्य समाज कार्यासाठी घालवणाऱ्या प्रा डॉ एन डी पाटील यांना पुरस्काराने गौरविण्यात आले. अनेक विद्यापीठाने त्यांना मानाची डि. लिट पदवी देऊन गौरवले. प्रा डॉ एन डी पाटील यांनी अनेक विषयांवर सखोल लेखन केले. शेती जमिनीवरील कमाल मर्यादा आणि महाराष्ट्र सरकारचा प्रतिगामी कायदा, समाज विकास योजनेचे वस्त्रहरण, वाढती महागाई आणि ग्राहकांची ससेहोलपट, काँग्रेस सरकार आणि शेतकऱ्यांची लूट, शेतीमालाला किफायतशीर किंमतीची हमी आणि घाऊक व्यापाराचे राष्ट्रीयकरण, महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप, शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी?, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ही त्यांनी लिहिलेले पुस्तके गाजली. प्रा डॉ एन डी पाटील यांनी अंधश्रद्धा निर्मूलन क्षेत्रातही काम केले. त्यांची मते ठाम होती. महाराष्ट्राच्या गेल्या सत्तर वर्षांच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासात प्रा. डॉ एन डी पाटील हे एक धडाडिचे आणि लढाऊ नेते म्हणून ओळखले जातात. प्रा डॉ एन डी पाटील म्हणजे महाराष्ट्राचा विवेक आवाज. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचा पुरोगामी आवाज हरपला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीची मोठी हानी झाली. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

# ‘हिंद दी चादर’ गुरु तेगबहादुर साहिब यांच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण

‘हिंद दी चादर’,श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीमार्फत गेल्यावर्षी ७ डिसेंबर रोजी झालेल्या देखण्या आयोजनानंतर २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत नांदेड येथे भव्य अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी स्वाभीमान आणि देश रक्षणासाठी दिलेले बलिदान अनन्य साधारण आहे. त्यांच्या परिवारातील सदस्यांनीही देशासाठी शहादत दिली. हा गौरवशाली इतिहास सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्याचे स्मरण करणारा आणि गुरुंनी देशासाठी दिलेल्या बलिदानावर प्रकाश टाकणारा हा लेख

कश्मीरचा सुभेदार हा शिखांचे नववे गुरु तेगबहादुर साहिब यांच्या मदतीसाठी गेले. ‘ना पेह देना ! ना पेह सेना’ म्हणत (घाबरायचे नाही व घाबरवयाचेही नाही) कश्मीरींच्या रक्षणासाठी गुरु तेगबहादुर साहिब यांनी थेट तत्कालीन सत्तेला आवाहन दिले व दिल्लीकडे कुच केली. आग्रा येथेच तेगबहादुरांना अटक करण्यात आली. दिल्लीला आणून त्यांना धर्मांतराची बळजबरी करण्यात आली. गुरु तेगबहादुरांनी त्यास नकार देऊन लाल किल्ल्यासमोरील चांदणीचौकात बलिदान दिले. त्यांचे हे बलिदान इतिहासात अमर झाले व भारतभूमीचे कवच म्हणून त्यांना ‘हिंद दी चादर’म्हणून ओळखले जाते. सत्य व अहिंसेचे प्रेषित असलेल्या तेगबहादुरांनी बलिदान देऊन मानवी स्वातंत्र्याचा व स्वतःस पटेल तो धर्म आचरण्याचा आदर्श भारतीयांना घालून दिला.

श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या सोबत अनेक समाज उभे होते विशेषत: सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, सिंधी समाजांनी या संघर्षात मोलाचे योगदान देत तेगबहादुर साहेबांनी दिलेल्या देश व मानवतेच्या रक्षणाची शिकवण सर्वदूर पोचवली. भाई मतीदास, भाई सतीदास आणि भाई दयाल गुरु तेग बहादुरांच्या आत्मसन्मानासाठी आणि गुरुनिष्ठेसाठी शहीद झाले. हे समाज सेवाभाव, साहस आणि श्रद्धेसाठी ओळखले जातात. दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ला परिसरातील चांदणी चौकात सीसगंज गुरुद्वारा सर्व भारतीयांसाठी प्रेरणास्त्रोत ठरला आहे. याच ठिकाणी गुरु तेगबहादुरांनी तत्कालीन सत्तेला आपल्या प्राणांच्या आहुतीतून भारतीयांच्या एकीचा व सद्भावनेचा संदेश दिला. २५ मे १६७५ रोजी सत्ताधाऱ्यांच्या आज्ञेनुसार गुरु तेगबहादुरांचे शिर अमानुषपणे धडापासून वेगळे करण्यात आले आणि ‘जो कोणी तेगबहादुरांचे उत्तर कार्य पार पाडेल त्याला व त्याच्या कुटुंबीयांना कठोर शिक्षा करण्यात येईल,’ असा फतवा काढला.

अशा दहशतीच्या वातावरणामध्ये ढवळून निघालेले भारतीय मन नव्या उमेदीने उभे राहण्यासाठी धडपडू लागले. सत्तेची अवाज्ञा करून भाई जेतासिंह यांनी त्यांचे ‘शिर’आनंदसाहेब दरबार येथे शिखांचे दहावे गुरू आणि गुरू तेगबहादुरांचे पुत्र गुरू गोविंदसिंह यांच्या सुपूर्द केले. इकडे भाई लखीशाह बंजारा यांनी मुलगा नाथईय्याजी यांच्या मदतीने गुरू तेगबहादुरांचे ‘धड’ दिल्लीतीलच रकाबगंज गावात आणले व आपल्या राहत्या घरात ते ठेवून घरालाच अग्नी दिला. त्यानंतर त्याच ठिकाणी पवित्र अस्थी जमिनीत पुरल्या आज तिथेच ‘रकाबगंज गुरुद्वारा’उभा आहे.

त्याग व शौर्याचे प्रतीक ‘सीसगंज’ आणि ‘रकाबगंज’ गुरुद्वारा

सरदार बघेलसिंह यांनी १७८३ मध्ये दिल्ली सर करून लाल किल्ल्यावर कब्जा मिळवला आणि गुरू तेगबहादुरांच्या शहीदस्थळी सीसगंज गुरूद्वारा बांधण्यात आला. पुढे १९३० रोजी याच गुरूद्वाऱ्याचे पुनर्निर्माण करण्यात आले. स्वधर्माची ज्योत भारतीयांमध्ये तेवत ठेवण्याकरिता व प्रसंगी बलिदान देण्याचा संदेश देणारा सीसगंज गुरूद्वारा भारतीयांचे मुख्य श्रद्धास्थान ठरले आहे. दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ला परिसात स्थित सीसगंज गुरुद्वारा हा दिगंबर जैन अतिशय क्षेत्र लालमंदिरापासून सुरु होणाऱ्या चांदणीचौकाकडील रस्त्यावर आहे, तर संसद भवनाच्या मागील भागात रकाबगंज गुरुद्वारा स्थित आहे. शीख धर्मियांचे मार्गदर्शक दहा गुरु आहेत. यापैकी दोन गुरु हे तेग बहादुरांचे आप्त आहेत. गुरु तेगबहादुर हे शिखांचे नववे गुरू असून सहावे शीखगुरू हरगोविंद यांचे ते सर्वात धाकटे पुत्र व शिखांचे दहावे व शेवटचे गुरू गोविंदसिंह यांचे ते पिता होत. तेगबहादुरांचा जन्म अमृतसर येथे झाला. वयाच्या ८ व्या वर्षी कर्तारपूर येथील लालचंदजी खत्री यांची कन्या गुजरी यांच्याशी तेगबहादुरांचा विवाह झाला. त्यांचे मूळ नाव त्यागमल होते. लहानपणीच त्यांना वैराग्य प्राप्त झाले. गृहस्थ असूनही ते वडिलांच्या मृत्युनंतर बकाला येथे जाऊन विरक्त वृत्तीने राहू लागले. शिखांचे आठवे गुरू हरकिशन यांच्या निधनानंतर १६६४ मध्ये तेगबहादुर यांना नववे गुरू म्हणून गादीवर बसविण्यात आले. त्यांनी स्वतःसाठी शिवालिक पर्वतराजीत एक नगर वसविले आणि तिथे आपली गादी स्थापून ते धर्मप्रचारासाठी यात्रा करू लागले. हे नगर आनंदपूर म्हणून पुढे शिखांचे प्रसिद्ध व पवित्र क्षेत्र बनले. पाटणा येथे त्यांचे पुत्र गोविंदसिंह यांचा जन्म झाला. पुढे शिखांचे दहावे व शेवटचे गुरू गोविंदसिंह म्हणून ते उदयास आले.

तेगबहादुर यांच्या कुटुंबातील सात सदस्यांचे बलिदान देशहितासाठी प्राणांचे बलिदान देणारे गुरु तेग बहादुर यांनी मोठा आदर्श घालून दिला. त्यांचीच शिकवण पुढे घेऊन जात त्यांच्या कुटुंबीयांनीही बलिदान दिले. आनंदपूरच्या लढायांनंतर सरदार वजीर खानाने गुरू गोविंदसिंग यांच्यावर हल्ला केला.यात मोठे दोन साहिबजादे अजीतसिंग आणि जुझारसिंग यांनी सरदाराच्या सैन्यासमोर शौर्याने लढत वीरगती प्राप्त केली. छोटे साहिबजादे जोरावरसिंग आणि फतेहसिंग यांना त्यांच्या आजी माता गुजरीजींसोबत सरहिंदच्या थडग्यात कैद करण्यात आले. वजीर खानाने त्यांना थंडीच्या रात्री उघड्यावर ठेवले आणि नंतर जिवंतपणे भिंतीत बंद करून मारले. या बलिदानाचे स्मरण करण्यासाठी केंद्र शासनाने २१ ते २७ डिसेंबर हा 'बलिदान सप्ताह' आणि २६ डिसेंबर हा 'वीर बाल दिवस' म्हणून घोषित केला व देशभर तो साजरा केला जात आहे. शिखांचे दहावे व शेवटचे गुरु, गुरु गोविंद सिंग यांनी १४ युद्धे लढली. १७०८ मध्ये नांदेड येथे देश रक्षणासाठी लढताना ते शहीद झाले.

गुरु तेगबहादुरांनी आसामपासून काश्मीरपर्यंत आपल्या सद्विचारांचा प्रसार केला. त्यांनी विविध विषयांवर ११६ पद्ये रचली. ही पद्ये पुढे गुरू गोविंदसिगांनी गुरु ग्रंथसाहिबात अंतर्भूत केली. यांतील ५९ पद्ये ‘शबद’ (स्तोत्रे) आणि ५७ पद्ये ‘श्लोक’ आहेत. त्यांच्या रचनेत वैराग्य व क्षमाशील वृत्तीचा उत्कृष्ट आविष्कार आढळतो. अहिंसा व सत्याचे प्रेषित असलेल्या तेगबहादुरांनी प्राण त्याग करून मानवी स्वातंत्र्याचा व स्वतःस पटेल तो धर्म आचरण्याचा आदर्श भारतीयांना घालून दिला. त्यांच्या बलिदानाने भारतीयांमध्ये जी अस्मिता निर्माण झाली तिला इतिहासात तोड नाही. तेगबहादुर साहिब यांच्या शहिदीला ३५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने यावर्षी भारतभर मोठया प्रमाणात विविध कार्यक्रम आखण्यात आले आहेत. ‘हिंद दी चादर’श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमानिमित्त राज्यभर विविध प्रबोधनपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. याअंतर्गत नागपूर येथील नारा परिसरातील सुरेश चंद्र सुरी मैदानावर ७ डिसेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्यावर भारतीय डाक विभागामार्फत विशेष टपाल तिकीट जारी करण्यात आले. सिंधी आणि पंजाबी समाजाच्या इतिहासाचे दर्शन घडविणाऱ्या ऐतिहासिक शस्त्रांचे प्रदर्शन लावण्यात आले. विदर्भ आणि छत्तीसगढ मधील शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, वाल्मीकी आणि सिंधी समाजबांधवानी एकत्र येऊन हा ऐतिहासिक समागम कार्यक्रम साजरा केला. श्री हुजूर साहिब नांदेड शीखांचे दहावे गुरू श्री गोविंद साहिबजी यांची कर्मभूमी ही महाराष्ट्रातील श्री हुजूर साहिब नांदेड असून याठिकाणी त्यांनी सर्व शीख बांधवांना उद्देशून, 'सब सिक्खन को हुकम हे गुरू मान्यो ग्रंथ साहिब' असा उपदेश दिला होता. हा मानवतेचा संदेश घरोघरी पोचविण्यासाठी व श्री गुरु तेग बहादुर साहिब यांच्या त्यागाची शिकवण समाजाच्या सर्व घटकांत पोचविण्याच्या उद्देशाने नांदेड येथे येत्या २४ व २५ जानेवारीला शहिदी समागम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.

नांदेडमध्ये देहरुपी गुरु जाऊन गुरुग्रंथ साहिबची स्थापना झाली. नांदेड येथील बंदासिंग यांनी गुरु गोविंद सिंग यांच्या प्रेरणेने पंजाबात जाऊन परकियांशी लढा दिला व प्रशासक बनले. त्यांनी सरहिंद जिंकून शेतकऱ्यांना जमीन मालकीचा अधिकार दिला आणि स्वराज्याची पायाभरणी केली.

गुरू गोविंद सिंग यांनी १७०६ मध्ये ‘जफरनामा’ हे पत्र लिहून सत्ता प्रमुखाला नैतिकतेचे आव्हान दिले. हे पत्र फारसी भाषेत असून, त्यात सत्ताधिशांच्या विश्वासघातकी वर्तनाचा, जुलूमांचा आणि शीखांवर केलेल्या अत्याचारांचा समाचार घेतला. पत्र वाचून बादशाहने गुरूजींना सन्मानाने आणण्याचा आदेश दिला, पण गुरूजींनी ते नाकारले. हे पत्र शीख इतिहासातील विजयाचे प्रतीक मानले जाते. मराठवाडयातील नरसी नामदेव हे थोर वारकरी संत, संत नामदेवांचे जन्म गावही याच भागात आहे. संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाच्या विस्ताराकरिता देशभ्रमण केले. पंजाबात गेले असता त्यांच्या उद्बोधनाने सर्व समाज भारावला त्यांच्या ६१ अभंगांचा शिखांच्या पवित्र गुरु ग्रंथसाहिबमध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे.

श्री गुरु तेग बहादुर साहिब यांचा देशरक्षण, सहिष्णुता आणि मानवतेचा संदेश महाराष्ट्रातील घराघरांत पोहचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासन तसेच शीख, सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, वाल्मिकी उदासीन आणि गुरुनानक नामदेव संगत, तखत नांदेड गुरुसाहेब यांचा समावेश असलेल्या श्री गुरु तेग बहादुर साहिबजी ३५० वी शहिदी समागम राज्यस्तरीय समितीमार्फत नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी शहिदी समागम कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. पंजाब, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगना आणि मराठवाडयातील शीख व अन्य समाज बांधव मोठया संख्येने यात सहभागी होणार आहेत. गुरु तेगबहादुरांच्या कार्याची महिती पोचविण्यासाठी प्रत्येक शाळा,महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये वक्तृत्व स्पर्धा, गीते, डाक्युमेंटरी प्रदर्शीत करण्यात येत आहेत. या सर्व आयोजनातून ‘हिंद दी चादर’श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांचे महान विचार आणि अजोड कर्तृत्वाचा परिचय जनतेला होणार आहे.

रितेश मो.भुयार,
माहिती अधिकारी,
माहिती व जनसंपर्क, नागपूर.

पान १ वरून

### भाजपची...

असून, त्यांनी आपला हा महत्त्वाचा बालेकिल्ला गमावला आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीने ४ जागा मिळवत किंगमेकरच्या भूमिकेत येण्याचे संकेत दिले आहेत.

केवळ संभाजीनगरच नव्हे, तर पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्येही भाजपने आपली सत्ता कायम राखल्याचे दिसत आहे. मुंबई महानगरपालिकेतही (इचउ) भाजप आणि ठाकरे गटात अटीतटीची लढत सुरू असून, तिथेही भाजप पहिल्या क्रमांकाचा पक्ष बनण्यासाठी प्रयत्नशील आहे. राज्यातील या निकालांनी आगामी विधानसभा निवडणुकीची नांदी दिली असून, विरोधकांसाठी हा निकाल आत्मचिंतन करायला लावणारा ठरला आहे.

छत्रपती संभाजीनगर हर्षदा शिरसाट प्रभाग क्रमांक १८ मधून मोठ्या मताधिक्याने विजय

पालकमंत्र्याची मुलं असल्यामुळे आमच्या विरोधात नाही ते आरोप करण्यात आले. आमच्यावरती आरोप केले मात्र आमच्या सोबत शिवसैनिक आहेत. शिवसैनिकांनी मनाने काम केलं आणि हा विजय त्यांचा विजय आहे. महानगरपालिकेत गेल्यानंतर असं काम करायचं की पुढच्या पाच वर्षानंतर आम्हाला लोकांकडे जायची गरज पडली नाही पाहिजे. महापौर पदाचा आणखीन आरक्षण निघालेलं नाहीये त्यावर मी भाष्य करू शकत नाही. जी काही घडामोड होईल ती पुढे होईल जेव्हा महापौर पदाचे आरक्षण निघेल.

### शरद पवारांना...

त्यांचे पुतणे अजित पवार त्यांच्या काकांपेक्षा चार पट जास्त जागांवर आघाडीवर आहेत.

राज्यात महापालिका निवडणुकीच्या निकालांच्या ट्रेंडवरून असे दिसून येते की अजित पवार यांचा पक्ष, राष्ट्रवादी सध्या ११४ वॉर्डांमध्ये आघाडीवर आहे. याचा अर्थ शरद पवार यांचे पुतणे अजित पवार त्यांच्या काकांच्या पक्षापेक्षा पाच पट जास्त जागांवर आघाडीवर आहेत. हे लक्षात घेण्यासारखे आहे की राष्ट्रवादी आणि शपा राज्यातील निवडणुका काँग्रेसपासून स्वतंत्रपणे लढवत आहेत. या निवडणुकीतील मनसेच्या कामगिरीच्या तुलनेत, मनसेची कामगिरी राष्ट्रवादी आणि सपा यांच्याशी तुलनात्मक आहे. राज्यात सध्या मनसेचे १७ उमेदवार आघाडीवर आहेत.

### मतचोरी हे राष्ट्रविरोधी...

जे निवडणूक निष्पक्षतेच्या विरुद्ध आहेय

पण त्याचवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे दावे पूर्णपणे फेटाळून लावले. शाईवरून होणाऱ्या वादावरून राज्य निवडणूक सुरूवातीला आयोग मागे पडल्याचे दिसून आले. पण प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी, आयोगाकडून मार्कर पेनच्या गुणवत्तेची आणि व्हायरल व्हिडिओची सविस्तर चौकशी करेल. व्हिडिओमध्ये दाखवलेली शाई खरी आहे की खोडसाळपणा आहे हे निश्चित केले जाईल. खबरदारी म्हणून, आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत मार्कर पेन वापरला जाणार नाही. असे जाहीर केले.

वाद संपवण्यासाठी, आयोगाने म्हैसूर पेंट्स अँड वार्निश लिमिटेडची फक्त पारंपारिक शाई वापरण्याचा निर्णय घेतला आहे. ही विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत वापरली जाणारी शाई आहे आणि ती पुसणे जवळजवळ अशक्य आहे. आयोग राज्यभरातून मार्कर पेनचे यादृच्छिक नमुने देखील गोळा करेल आणि ते प्रयोगशाळेच्या चाचणीसाठी पाठवेल.

### कोण होणार...

अभिषेक घोसाळकर यांच्या हत्येनंतर, तेजस्वी यांचा समावेश त्याच बँकेच्या संचालक मंडळावर करण्यात आला, जो भाजप आमदार प्रवीण दरेकर यांच्या प्रभावाखाली असल्याचे मानले जाते. या घटनेने तेजस्वी यांच्या राजकीय कारकिर्दीला चालना मिळाली आणि त्यांच्या पक्ष बदलाच्या चर्चांणा उधाण आले. तेजस्वी घोसाळकर यांनी २०२२ मध्ये वैयक्तिक कारणांमुळे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा राजीनामा दिला. आता, त्यांच्या विजयासह, भाजपमध्ये त्यांच्या भविष्याबद्दल चर्चा तीव्र झाल्या आहेत आणि मुंबई महापौरपदाच्या शर्यतीत त्यांचे नाव प्रमुखतेने घेतले जात आहे.

### लातूर महानगरपालिका...

लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहूल गांधी, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह अनेक नेत्यांनी भक्कम पाठबळ दिले, वंचित बहूजन आघाडीचे नेते आदरणीय प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर, आदरणीय दिलीपराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी आमदार जिल्हा बॅंकेचे चेअरमन धिरज देशमुख, वंचित बहूजन आघाडीचे युवा नेतेचे सुजात आंबेडकर, प्रदेया सचिव मुफती वसीम सय्यद, काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस जिंतेद्र देहाडे, भाऊसाहेब आजबे, स्टार प्रचारक हनुमंत पवार यांनी प्रचार सभा घेतल्या. माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी मंत्री विजय वडडेटीवार, माजी मंत्री सतेज पाटील यांच्यासह अनेक नेत्यांनी सोशल मिडीयाच्या माध्यमातून आवाहन करुन प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहकार्य केले. स्थानीक काँग्रेस आणि वंचित बहूजन आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी अहोरात्र परिश्रम केले या सर्वांचे आभार व्यक्त करीत असल्याचे माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी म्हटले आहे.

### पुणेकरांनी...

आपल्या भाषणात केवळ विकासावर बोलल्याचे दिसून आले. दरम्यान अजित पवारांनी सत्तेत येण्यासाठी मेट्रोचा प्रवास मोफत देण्याची घोषणा पुणेकरांसाठी केली होती. पीएमपी प्रवास आणि अन्य गोष्टीची घोषणा करण्यात आली होती. मात्र पुणेकरांनी त्यांची जाहीरनामा सपशेल नाकारला असल्याचे दिसत आहे.

पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत अजित पवारांनी भाजप नेत्यांवर निशाणा साधला होता. पुणे हा भाजपचा बालेकिल्ला समजला जातो. त्यामुळे भाजप नेत्यांवर टीका केल्याने देखील जनतेने त्यांना नाकारले असल्याचे कारण समोर येत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात प्रचारसभ्य घेत पूर्णपणे विकासाचे व्हीजन मांडले. मात्र विरोधकांनी केलेल्या टीकेला त्यांनी प्रत्युत्तर दिले. तसेच शेवटच्या टप्प्यात त्यांच्या अनेक अभिनेत्यांनी घेतलेल्या मुलाखती देखील पुण्यात प्रभावी ठरल्या आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सहजरीत्या पुण्याचा विजय खेचून आणल्याचे म्हटले जात आहे.

२९ महानगरपालिकांच्या निवडणुकीत राष्ट्रीय स्वयंवसेवक संघ देखील मैदानात उतरला असल्याचे म्हटले जाते. पुणे महानगरपालिका निवडणुकीत घरोघरी पोचण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक मैदानात उतरले होते अशी चर्चा आहे. विधानसभा निवडणुकीप्रमाणेच सूक्ष्म नियोजन आणि योग्य प्रचार यामुळे पुण्यात भाजपल फायदा झाल्याचे म्हटले जाते. तर याचा फटका अजित पवारांना बसल्याचे दिसून येत आहे.

### लातूर महानगरपालिका...

मते मिळालेली आहेत. त्यांच्या विरोधामध्ये काँग्रेसपक्षाकडून उभारलेल्या सुंदर पाटील कव्हेकर यांना २२३० मतदान मिळालेले आहे. भारतीय जनता पार्टीच्या प्रभाग १८ च्या उमेदवार अदिती अजित पाटील कव्हेकर या पहिल्यांदाच महापालिका निवडणूक रिंगणात उतरल्या असल्या तरी त्यांनी डोअर-टू डोअर जाऊन प्रचाराची पताका कायम ठेवली. त्यामुळे प्रचारामध्ये घेतलेल्या प्रचंड परिश्रमामुळे आणि प्रचाराच्याकालावधीतच विविध कार्यामध्ये घेतलेल्या पुढाकारामुळे प्रभाग १८ मधील जनता कायम पाठीशी असल्याचे दिसून आले आणि पहिल्याच प्रयत्नामुळे महापालिका निवडणुकीमध्ये २८३४ मताधिक्यांची लीड घेऊन भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून ऐतिहासिक विजय मिळविण्यात त्यांना यश मिळालेले आहे. त्यांच्या या ऐतिहासिक यशाबद्दल प्रगतीबद्दल त्यांचे माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर, प्रमोदिनीताई पाटील कव्हेकर, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, जेएसपीएमचे कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, विश्वजीत पाटील कव्हेकर, रोहित पाटील, दिलील पाटील, अशोक पाटील, अप्पासाहेब पाटील, किशोर घार,भागवतराव संपत्ते, नेताजी मस्के, दत्ता चेवले, जाफर पटेल, फिरोज पटेल, सुभाषअप्पा सुलगुडले, सूर्यकांतराव शेळके, बालाजी शेळके,निशिकांत मजगे, भिमाशंकर गाढवे, संजय गिर,शशिकांत हांडे, बाळासाहेब शिंदे, गोविंद सोदले,शिवशरण थंबा, गोपाळ सारगे, लाला पाटील,श्री. गोलावार, द्याडे आप्पा, राजेसाहेब देशमुख, डी.आर.शेटे, बापुसाहेब गोरे, मारुती सूर्यवंशी, गोविंद शिंदे, शिवाजी सूर्यवंशी, सूर्यकांत चव्हाण, राजकुमार शेटे, राजाभाऊ मुळे, धनंजय बाचपल्ले, अनंत माने, जाजू शेठ, महादेव गायकवाड, भूजंग पाटील, सुरेशअणा सूर्यवंशी,जावेद शेख, शुभम पाटील, महादेव पिटले, आकाश पिटले, वैभव भोसले, उध्दव जाधव, केदार पाटील, सरदार शेख, गोपाळ वांगे,शितल कुलकर्णी, आश्विन कांबळे, आफ्रिन खान, विश्वंभर घार, मनोज गायकवाड, अरूणा कांदे, दिपमाला मस्के, अमर जाधव, कमलाकर कदम यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## काँग्रेसचे ५ शहरांत महापौर तर ३५० नगरसेवक

मुंबई : महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाला मिळालेले यश समाधानकारक नसले तरी यश अपयशाची पर्वा न करता आम्ही वैचारिक लढाई लढलो. जनतेचा विश्वास व कार्यकर्त्यांचा निर्धाराचा लढा या जोरावर काँग्रेस पक्ष राज्यातील सर्वात मोठा विरोधी पक्षाच्या भूमिकेत दिसत आहे. पाच शहरांत काँग्रेसचा महापौर तर ३५० नगरसेवक आणि १० ठिकाणी सत्तेत सहभागी होऊ असे चित्र आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, संक्रातीच्या पर्वावर महानगरपालिकेच्या निवडणुका झाल्या. काँग्रेस राज्यात दुस-या क्रमांकाचा पक्ष बनला आहे. जेथे शक्य आहे तेथे स्वबळावर तर काही ठिकाणी आघाडी करून काँग्रेस पक्षाने वैचारिक व संघटनात्मक वाढीसाठी निवडणूक लढली. सत्ताधारी भाजपा महायुतीने पैशाचा प्रचंड वापर केला, बोगस मतदान झाले, कुठलीही तडजोड न करता भाजपच्या बुलडोझरसमोर काँग्रेस कार्यकर्ता निर्धाराने उभा राहिला. हा कार्यकर्त्यांचा विजय असून लढणा-या कार्यकर्त्यांचा सार्थ अभिमान आहे, विजयी उमेदवार व कार्यकर्त्यांचे अभिनंदन करतो. हा काळ संघर्षाचा, वैचारिक लढाईचा आहे आणि काँग्रेस ही लढाई लढण्यास कटीबद्ध आहे. अपयशाने खचून न जाता पुढच्या लढाईसाठी आम्ही सज्ज आहोत असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

मुंबईतील भाजपाचे यश फिक्सिंगमुळे

मुंबईत भाजपाला मिळालेले यश हे फिक्सिंगचा भाग आहे. प्रभाग रचनेपासून पाडू नावाच्या मशिनपर्यंत व शाईचा घोळ हा सर्व फिक्सिंगचा खेळ होता. निवडणूक आयोगाने सावरासावर करणे बंद करावे तसेच भाजपाच्या इशा-यावर चालणे बंद केले पाहिजे. भाजपाकडे कसलीही नैतिकता, लाज राहिलेली नाही. लोकशाही खरोखरच संकटात आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही, पाकिट वाटप, बोगस मतदार, उमेदवारांची पळवापळवी, व निवडणूक आयोगाचा गलथान कारभार हे सर्व पाहता फ्रि अँड फेअर निवडणुका होत नाहीत हे स्पष्ट दिसले, अशी टीका त्यांनी केली.

हुकूमशाहीचा फुगा फुटतो

हुकूमशाही वाढत वाढत जाते पण एका ठिकाणी त्याचा फुगा फुटतो, आता हा फुगा फुटण्याचा क्षण जवळ आला आहे. कालच उत्तरायण सुरु झाले आहे पुढचा काळ भाजपा व त्यांच्या मित्रपक्षांसाठी अडचणीचा राहणार आहे असा इशारा सपकाळ यांनी दिला. भाजपाच्या विजयाचे वर्णन करताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की करुन घेतले बोगस मतदान, वाटल्या नोटा, निवडणूक आयोगाच्या मदतीने कमळाबाई बांधते सत्तेचा फेटा.

Printed by, Owned by, Published by & Edited by GANGADHAR ABHANG DIGOLE , Printed by GHONE NARASHINHA PANDURANG, Printed at Magic Publication, Shop No.10, MANAPA SHOPING COMPLEX, GANDHI CHOWK, LATUR, Tq.& Dist. LATUR - 413512 & Published at H.No.255, Shri SAI SCHOOL NEAR, Sona Nagar, Barshi Road, LATUR, DIST- LATUR-413512 Tq.& Dist. PARBHANI - 431401 MAH. Editor : GANGADHAR ABHANG DIGOLE RNINO.MHMAR/25/A1409

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक- गंगाधर अभंग डिगोळे यांचे करीता घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १० मनपा शॉपिंग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय घर नं. २५५, श्री साई स्कूल निअर सोना नगर, बार्शी रोड, लातूर, ता. जि. लातूर . - ४१३५१२, येथे प्रकाशित केले. संपादकः गंगाधर अभंग डिगोळे मो.९४०५२९५२०, ९०२८८४५२३३ RNINO.MHMAR/25/A1409

# धाराशिवमध्ये नामांतर दिनी रंगला विद्रोही कवींचा एल्गार



धाराशिव (प्रतिनिधी) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार मंचच्यावतीने विद्रोही कवी संमेलनाचे दि. १५ जानेवारी रोजी आयोजन करण्यात आले.

धाराशिव येथील नालंदा फॅशन डिझायनिंग कॉलेजमध्ये आयोजित कवी संमेलनाचे अध्यक्ष कवी पंडित कांबळे यांनी आपल्या कवितेतून आजच्या समाजातील वास्तव मांडताना.... वांझ घोषणा फसवे दावे वेळीच ओळखा वागणं हे असेच चालले तर... सामान्यांचे संपेल जगणं तर कयवित्री भाग्यश्री वाघमारे यांची दिशा अंधारलेल्या मनुवाद्यांच्या विळख्यात बंदिस्त श्वास चोहोकडून चाललाय मानवतेचा ऱ्हास... यातून मानवी मूल्य कसे पायदळी तुडविली जातात ? ते सांगितलेले आहे. तसेच आशा गायकवाड यांची दिली तू वृक्षाची छाया कसे ऋण फेडू भीमराया कविता सादर केली. तर प्रभाकर बनसोडे यांची एक भीमरावांचे विचार.. तर अनिता ठोकळे यांची लाखात एक होती माझ्या भीमाची लेखणी तर प्रा. शिवराम अडसुळे यांनी आयुष्याची गाथा मांडली. तसेच शामल ताकपिरे यांच्या सूर्याची सावली.. माता रमाई.. या कवितेने रसिकांना मंत्रमुग्ध केले. तर त्रिशाला ठाणांबीर यांनी साऊ ही कविता सादर केली. तसेच शीला पवार यांनी १४ तारखेचं बाबासाहेबांच्या जीवनातील महत्त्व आपल्या कवितेतून व्यक्त केले. तर उत्कर्षा वाघमारे यांनी खूप खूप सोसलं आमच्या जातीनं.. आआईच्या ऐवजी आरक्षणाचा शिकवलं जातं... हे सांगितलं. तसेच कवी शहाजी कांबळे यांची अरे अरे माणसा जुन्याचा कशाला पुळका जग एकविसाव्या शतकाकडे तुम्हीच ओळखा.. ही कविता भविष्याचा वेध सांगून गेली. तर विजय गायकवाड यांची आम्ही पांथस्थ हाती निखारे आणि मशाली घेऊन निघालो क्रांतीकडे तसेच रविंद्र शिंदे यांची भीमाचा मी सैनिक आहे रक्तात माझ्या भीम बाणा आहे .. तर पृथ्वीराज चिलवंत यांनी माणूस की, माणूस प्राणी हे सांगितले. तसेच अभिमन्यू इंगळे यांनी असा क्रांतीसुर्य होता. तर अरुण कांबळे यांनी चला रे मुलांनो शाळेला. तसेच अश्विनी बनसोडे यांची शल्य ही कविता तर दीपक केंगार यांचा विद्रोह तसेच के. व्ही. सरवदे यांची पारख तर ड. अजय वागळे यांचे न्याय दर्शन तसेच सोमनाथ लांडगे यांची बाबासाहेब होते म्हणून.. तर सौरभ लोखंडे यांचे बंडखोर वास्तव.. तसेच विकास काकडे यांची गौतम बुद्ध अशेचा किरण तू.. तर सायुरी सूर्यवंशीचा लढा मनातला.. आणि सचिन दिलपाक यांची भीम तुझ्याशी नाळ जोडताना... तर बाळू शिंदे यांनी भिरूड लागलय भिरुड. अशा वेगवेगळ्या संदर्भाने बाबासाहेबांचा विद्रोह कवितेतून मांडून रशीकश्रोत्यांना कवींनी मंत्रमुग्ध करुन वेगळ्याच उंची वरती हे कवी संमेलन गेले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब मनोहर यांनी तर आभार प्रा. अंबादास कळासरे यांनी मानले. या कार्यक्रमास विचार मंचाचे अध्यक्ष प्रा. रवी सुरवसे, जगदीश जाकते, मारुती पवार, सुप्रसिद्ध कवी रवी केसकर, अमोल गडबडे, राजेंद्र अंगरखे, विकास काकडे, चंद्रकांत मस्के, जयराज खुने, सुदेश माळाळे, सुनील बनसोडे, ॲड. अजित कांबळे यां यांच्यासह वेगवेगळ्या क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आचार संहितेची तातडीने प्रभावी अंमलबजावणी करावी - पुजार



धाराशिव (प्रतिनिधी) – जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकारी कर्मचाऱ्यांची त्वरित बैठक घेऊन आदर्श आचार संहितेची तातडीने प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी दिले.

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकीत आदर्श आचार संहितेची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी सहाय्यक तथा जिल्हाधिकारी उपविभागीय अधिकारी रेवैयाह डोंगरे, उपजिल्हाधिकारी (सामान्य) स्वाती शेंडे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अनुप शेंगुलवार, निवडणूक निर्णय अधिकारी सर्वश्री प्रवीण धरमकर, संतोष राऊत, अरुणा गायकवाड, श्रीकांत पाटील, ओंकार देशमुख, दत्तू शेवाळे, गणेश शिंदे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हर्षल डाके, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक हर्षवर्धन शिंदे, वीज वितरणचे कार्यकारी अभियंता नरेंद्र रडे यांच्यासह सर्व तहसिलदार व सर्व गट विकास अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. पुढे बोलताना पुजार म्हणाले की, निवडणुकीच्या काळात कायदा व सुव्यवस्था कायम रहावी. नामांकनपत्रे दाखल करताना गोंधळ होणार नाही याची माहिती राजकीय पक्षांच्या बैठकीत द्यावी. विविध राजकीय पक्षांच्या रॅलीमध्ये सहभागी असलेल्या वाहनांची नोंद घ्यावी, सर्व राजकीय पक्षांना समानतेची चागणूक द्यावी. आचार संहितेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी. नामनिर्दे शनपत्रे या निवडणुकीत ऑफलाईन दाखल करावी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले. निवडणूक विषयक माहिती देताना शेंडे म्हणाल्या की, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे व चिन्ह वाटप २७जानेवारी रोजी दुपारी ३.३० वाजल्यानंतर करण्यात येईल. मतदान ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत होईल. तर मत मोजणी ७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजतापासून सुरू होईल. या निवडणुकीत एकूण ११ लक्ष ४५ हजार ८८८ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे. यामध्ये ६ लक्ष ५ हजार ८४३ पुरुष, ५ लक्ष ४० हजार ३७ स्त्री व ८ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. या निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहिता अंमलबजावणी समिती, वाहतूक व्यवस्थापन समिती, कायदा व सुव्यवस्था समिती, प्रसारमाध्यम व संदेश वहन समिती, नियंत्रण कक्ष, जिल्हास्तरीय खर्च नियंत्रण समिती व जनजागृतीसाठी नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. या निवडणुकीसाठी १३०८ मतदान केंद्रावर मतदार होणार आहे. आठही तालुक्यात प्रत्येकी एक आदर्श मतदान केंद्र असून पस्दानशील मतदान केंद्राची संख्या २० आहे. प्रत्येक तालुक्यात प्रत्येकी १ महिला व प्रत्येकी १ दिव्यांग मतदान केंद्र राहणार आहे. संवेदनशील मतदान केंद्रामध्ये भूम तालुक्यातील पाटसांगवी व लोहारा तालुक्यातील धानुरी येथील मतदान केंद्राचा समावेश असल्याची शेंडे यांनी सादरीकरणाद्वारे दिली.

# स्वीकृत नगरसेवक पदासाठी अजिंक्य नटुरे यांचा अर्ज दाखल



धाराशिव (प्रतिनिधी) नगरपरिषद अध्यक्ष व नगरसेवक पदाच्या निवडणुका पार पडल्या आहेत. नगराध्यक्षांनी पदभार स्वीकारून कारभार सुरू केला आहे. तर विषय समित्या व स्वीकृत नगरसेवक पदासाठी प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यामुळे राष्ट्रीय किसान बहुजन पार्टीच्यावतीने अजिंक्य अरुण नटुरे यांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे स्वीकृत नगरसेवक पदासाठी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे सत्ताधारी व विरोधी पक्षातील नगरसेवकांच्या भुवया उंचावल्या असून राजकीय वर्तुळात नव्याने वेगळीच चर्चा सुरू झाली आहे.

# पंचायत समिती सभापतीपदासाठी महायुतीत स्पर्धा

उमरगा (प्रतिनिधी) –पंचायत समितीचे सभापतीपद अनुसुचित जातीसाठी राखीव झाले आहे. महायुतीसह महाविकास आघाडीचे अनेक इच्छुक दंड थोपटून तयार आहेत. भाजपाचे कैलास शिंदे यांनी भुसणी गणातून तर शिवसेना (शिंदे) च्या कु. आकांक्षा चौगुले यांनी कवठा गणातून चाचपणी सुरू केली आहे. त्यामुळे सभापती पदासाठी महायुतीच्या दोन पक्षात चुरस असल्याचे दिसून येत आहे. महाविकास आघाडीने अद्याप आपले पत्ते उघडलेले नाहीत.

उमरगा तालुक्यात जिल्हा परिषदेच्या ९ तर पंचायत समितीच्या १८ जागा आहेत. जिल्हा परिषद, पंचायत समिती या सारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका म्हणजे ग्रामीण भागात स्थानिक पातळीवर राहून पक्ष, संघटनेचे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना राजकारण व समाजकारण करण्याची संधी असते. गावागावांमध्ये आपले व्यवसाय, शेती सांभाळत असे कार्यकर्ते पक्षांचे काम करत असतात. 'मिनी मंत्रालय' अशी ओळख असणाऱ्या जिल्हा परिषदेच्या रुपाने जिल्ह्याची सत्ता ताब्यात ठेवण्यासाठी सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे. कार्यकाल संपलेल्या जिल्हा परिषदेत उमरगा तालुक्यातून कॉंग्रेसचे ५ सदस्य होते. यापैकी चौघांनी माजी मंत्री बसवराज पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाजपात प्रवेश केला आहे. तसेच पूर्वीच भाजपाचे २ सदस्य होते. तर शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रत्येकी एक जिल्हा परिषद सदस्य होते.

उमरगा पंचायत समितीचे सभापती पद अनुसुचित जातीसाठी राखीव आहे. तालुक्यातील अनुसुचित जातीसाठी भुसणी तर अनुसूचित जाती महिलांसाठी केसरजवळगा व कवठा हे गण राखीव आहेत. यापैकी निवडुन येणाऱ्या सदस्याला सभापती पदाचा मान मिळणार आहे. त्यामुळे सर्वपक्षीय इच्छुकांचा डोळा या तीनच मतदारसंघावर आहे. या जागेसाठी शिवसेनेचे माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांची कन्या, ज्ञानज्योती सामाजिक संस्थेचे संस्थेच्या अध्यक्षा कु. आकांक्षा चौगुले यांना शिवसेनेकडून कवठा गणातुन उमेदवारी देण्याची मागणी होत आहे. भारतीय जनता पक्षात नेत्यांची मोठी टीम व मोठा जनाधार असलेला पक्ष आहे. भाजपात इच्छुकांची भाऊगर्दी असली तरी समाजाचा चेहरा म्हणून कैलास शिंदे यांनी भुसणी पंचायत समिती मतदारसंघातुन निवडणुक लढवणेस इच्छुक असल्याचे समजते. भाजपाकडून सभापती पदाचे कैलास शिंदे हेच प्रबळ दावेदार आहेत. शिवसेना (ठाकरे) व काँग्रेसकडून कोण तुल्यबळ उमेदवार नजरेस येत नसले तरी ऐनवेळी शिवसेना (ठाकरे) विधानसभेचा पॅटर्न राबवणार का ? कॉंग्रेसच्या अनेकांनी विधानसभा निवडणुक लढवण्याची तयारी केली होती. मात्र शिवसेना (ठाकरे) ला जागा सुटल्याने त्यांचा हिरमोड झाला आहे. आता सभापती पद अनुसुचित जातीसाठी सुटल्याने मिनी आमदार म्हणून तालुक्याचे सभापतीपद बुजवण्यासाठी कोण इच्छुक आहे हे अद्याप स्पष्ट नाही. राष्ट्रवादी (अप) नेतृत्व भारतीय जनता पक्षासोबत जुळवून घेण्यासाठी इच्छुक आसल्याचे दिसून येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शप) ची कोणासोबत समेट होणार, मनसे व वंचित बहुजण आघाडी कोणती भूमिका घेणार हे त्या त्या वेळी स्पष्ट होणार आहे.

# देशाला जिजाऊंच्या विचारांची गरज आहे :प्रा. बनबरे



परंडा (प्रतिनिधी) प्रत्येक घरात एक जिजाऊ जन्माला आली तर प्रत्येक घरात एक शिवाजी घडेल. त्यामुळे आज देशाला जिजाऊंच्या विचारांची गरज असल्याचे प्रतिपादन प्रा गंगाधर बनबरे यांनी केले.

परंडा येथील शिक्षण महर्षी गुरुवर्य रा गे शिंदे महाविद्यालयात जिजाऊ संस्कार प्रबोधिनी परांडा व शिक्षण महर्षी गुरुवर्य रा गे शिंदे महाविद्यालय परंडा याच्या संयुक्तपणे राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून करमाळा येथील विद्या विकास मंडळाचे सचिव विलास घुमरे तर प्रमुख अतिथी म्हणून टेंभुर्णी सरपंच दत्ता माऊली शिक्षण प्रसारक मंडळ व समाजसेवा मंडळच्या सचिव सुरजा बोबडे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ महेशकुमार माने, मनीषा रणजीत पाटील, जिजाऊ संस्कार प्रबोधिनीचे संस्थापक भारत घोगरे गुरुजी, कल्पना रवी मोरे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ शहाजी चंदनशिवे, कनिष्ठ विभागाचे पर्यवेक्षक प्रा किरण देशमुख यांची उपस्थिती होती. यावेळी आशा मोरजकर, विमल भातलवंडे, अनिता रोडगे, देवानंद टकले, काकासाहेब साळुंखे, अंगद धुमाळ, दैनिक पुण्यनगरीचे तालुका प्रतिनिधी सुरेश घाडगे, दैनिक दिव्य मराठीचे तालुका प्रतिनिधी प्रमोद वेदपाठक, राजेंद्र कुमार निकाळजे, महावीर तनपुरे, तन्मय राम शिंदे, महावीर काशीद यांना राजमाता जिजाऊ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच महाविद्यालयातील कु. अक्षता खराडे, रेहान बेग, प्राची गणगे या विद्यार्थिनींना प्रवेश त्यांचाही विशेष सत्कार या करण्यात एमबीबीएसमध्ये मिळाल्याबद्दल आला. या कार्यक्रमासाठी कनिष्ठ, महाविद्यालयातील वरिष्ठ विभागातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, जिजाऊ ब्रिगेड, मराठा सेवा संघ, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ शहाजी चंदनशिवे यांनी तर सूत्रसंचालन प्रा संभाजी धनवे यांनी व उपस्थितांचे आभार प्रा शंकर अंकुश यांनी मानले.

# महाडीबीटीवरील प्रलंबित १,७६४ शिष्यवृत्ती अर्ज तात्काळ निकाली काढा

धाराशिव, (प्रतिनिधी) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत देण्यात येणाऱ्या भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती तसेच व्यावसायिक पाठ्यक्रमात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारा निर्वाह भत्ता आदी योजनांसाठी सन २०२५- २६ या शैक्षणिक वर्षाकरिता अर्ज भरण्याची प्रक्रिया http://mahadbtmahit.gov.ळप या संकेतस्थळावर दिनांक १ जुलै २०२५ पासून सुरू करण्यात आलेली आहे.

त्यानुषंगाने महाडीबीटी प्रणालीवरील डॅश बोर्डचे अवलोकन केले असता २०२५- २६ साठी एकूण ५९४३ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले असून त्यापैकी १७६४ अर्ज हे महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत महाविद्यालयांना वेळोवेळी निर्देश देण्यात आले असले तरी अद्याप अनेक महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी अर्जाची पडताळणी करून ते सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाकडे सादर केलेले नाही. त्यामुळे सर्व महाविद्यालयांनी ऑनलाईन प्राप्त झालेल्या अर्जाची शासन निर्णयातील निकषांनुसार परिपूर्ण छानननी करून पात्र अर्ज तात्काळ समाज कल्याण कार्यालयाकडे अग्रेषित करावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच २०२४- २५ च्या तुलनेत सन २०२५- २६ मध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे महाडीबीटी प्रणालीवरील अर्ज नोंदणीचे प्रमाण कमी शिष्यवृत्ती असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे ज्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी अद्याप शिष्यवृत्ती अर्ज भरलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांना महाविद्यालय स्तरावरून सूचित करून अर्ज भरण्यास प्रवृत्त करण्यात यावे. विहित मुदतीत अर्ज निकाली न काढल्याने अथवा अर्ज न भरल्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील एखादा विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची व विद्यार्थ्यांची राहील, याची गांभीर्यपूर्वक नोंद घ्यावी, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी केले आहे.

# जिल्ह्यात १५ ते २८ जानेवारी दरम्यान जमावबंदी व शस्त्रबंदी आदेश लागू

धाराशिव, (प्रतिनिधी) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये जिल्ह्यात जमावबंदी व शस्त्रबंदी आदेश लागू करण्यात आले आहेत. जिल्ह्यात विविध यात्रा, जत्रा, ऊर्स, महापुरुष व राष्ट्रीय पुरुष यांच्या जयंती, धार्मिक कार्यक्रम तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था बिघडण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.

२६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर विविध संघटना, पक्ष व गटांकडून धरणे, मोर्चे, आंदोलने, उपोषणे, बंद, निदर्शने, रास्ता रोको, तालाठोको यासारखे आंदोलनात्मक कार्यक्रम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात शांतता व कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी दिनांक १५ जानेवारी रोजी रात्री १ वाजेपासून ते २८ जानेवारी रोजी रात्री १२ वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरून) संपूर्ण जिल्ह्यात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७(१) (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत.

अपर जिल्हादंडाधिकारी धाराशिव विद्याचरण कडवकर यांनी त्यांच्या अधिकारांचा वापर करून खालील बाबींवर मनाई केली आहे. शस्त्र, सोटे, काठ्या, तलवारी, बंदुका जवळ बाळगणे, लाठ्या, काठ्या किंवा शारीरिक इजा करू शकणाऱ्या वस्तू बाळगणे, दाहक पदार्थ किंवा स्फोटके जवळ बाळगणे, दगड, फेकण्यायोग्य साधने किंवा स्फोटक साहित्य साठवणे अथवा वापरणे, प्रक्षोभक भाषणे, असभ्य वर्तन, विडंबनात्मक नकला, सभ्यता व नीतीमत्तेला बाधा आणणारे प्रकार, संविधान विरोधी, देशाच्या सार्वभौमत्वाला धक्का देणाऱ्या घोषणा, गाणी, वाद्य वाजविणे किंवा कृती, व्यक्ती, मृतदेह, प्रेते किंवा त्यांच्या प्रतिमांचे प्रदर्शन, पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा जमाव किंवा मोर्चा, मिरवणूक काढण्यास मनाई (परवानगीशिवाय) करण्यात आली आहे. मात्र हे आदेश अंत्ययात्रा, धार्मिक विधी, विवाहसोहळे, सामाजिक सण, शासकीय कार्यक्रम, शासकीय सेवेत तैनात कर्मचारी तसेच सार्वजनिक करमणुकीची ठिकाणे (सिनेमागृहे, रंगमंच इ.) यांना लागू राहणार नाहीत. प्रतिबंधात्मक आदेशाच्या कालावधीत कोणताही मोर्चा, मिरवणूक, सभा अथवा निवडणूक प्रचार सभा आयोजित करावयाची असल्यास पोलीस अधीक्षक धाराशिव किंवा संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी (धाराशिव, तुळजापूर, उमरगा, कळंब व भूम) यांची लेखी परवानगी घेणे बंधनकारक राहील. अशी परवानगी घेतल्यानंतरच संबंधित कार्यक्रमास सूट मिळेल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## राज्यातील २२ मनपात मनसेला भोपळा

मुंबई : आज महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका निवडणुकांचे निकाल लागले. आतापर्यंत हाती आलेल्या निकालांनुसार, बहुतांश ठिकाणी भाजपने बहूमत मिळवले आहे. यात मुंबई मनपाची देशभरात चर्चा सुरू होती. या निवडणुकीच्या निमित्ताने दोन दशकांनंतर ठाकरे बंधू एकत्र आले होते. त्यामुळेच, उद्धवसेना आणि मनसे किती जागा जिंकणार, याकडेच सर्व राज्याचे लक्ष लागून होते. मुंबई मनपात प्रथमच भाजपला बहुमत मिळण्याची स्पष्ट चिन्हे दिसत आहेत. तर, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) यांची कामगिरी अतिशय निराशाजनक ठरली आहे. मुंबई मनपात उद्धवसेना ६० च्या आसपास जागा जिंकताना दिसत आहे, तर मनसेला दुहेरी आकडाही गाठता आलेला नाही. मनसेचा मोठ्या शहरांत दणदणीत पराभव आपल्या राजकारणात नेहमी मराठी आणि स्थानिक विरुद्ध बाहेरचे, असा मुद्दा मांडणा–या मनसेला या निवडणुकीत मोठा धक्का बसला आहे. राज्यातील २२ शहरांत मनसेला एकही जागा मिळालेली नाही. एकूणच पक्ष दहाच्या आकड्यातही पोहोचताना दिसत नाही.

# आर्य चाणक्यच्या मॉडेलची राज्य स्तरावर निवड



धाराशिव (प्रतिनिधी)– शहरातील आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयाच्या वरून धर्म या विद्यार्थ्याने तयार केलेल्या टाकाऊ पासून टिकाऊ या संकल्पनेवर आधारित कंपोस्ट खत निर्मिती मॉडेलची राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.

जिल्हास्तरीय ५३ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०२५-२६ तुळजापूर येथील तुळजाभवानी सैनिकी स्कुलमध्ये दि.१२ व १३ जानेवारी आयोजित करण्यात आलेले होते. या विज्ञान प्रदर्शनात आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयातील वरून समीर धर्म या इयत्ता नववीच्या विद्यार्थ्याने तृतीय क्रमांक पटकवला असून त्याच्या स्मार्ट मल्टीटास्किंग डस्टबिन या मॉडेलची आता राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली आहे.

ही डस्टबिन हवी त्या ठिकाणी आपोआप मुव्हेबल आहे. या मल्टी टास्किंग डस्टबिन मध्ये घरगुती कचऱ्याचे ओला व कोरडा कचरा विभाजन करून त्यात कचरा कमीत कमी वेळात कंपोस्ट मध्ये रूपांतर केला जातो. अशा या टाकाऊ कचरा व्यवस्थापन व पर्यावरण पूरक मॉडेलची राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात निवड झाल्याबद्दल मुख्याध्यापक डॉ मनीष देशपांडे यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. या विद्यार्थ्याला विज्ञान शिक्षिका शिंदे यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल वरून समीर धर्म याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# खासदार प्रणिती शिंदेंच्या प्रभागात भाजपचा दणदणीत विजय

सोलापूर : सोलापूर महानगरपालिका निवडणूक निकालात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांचे निवासस्थान असलेल्या प्रभाग क्रमांक २३ मध्ये भाजपने महाविकास आघाडीचा सुफडा साफ करत मोठा विजय मिळवला आहे. या प्रभागात भाजपच्या पॅनलने भरघोस मतांनी विजय संपादन मिळवला आहे. राजकीय वर्तुळात या निकालाची जोरदार चर्चा सुरू आहे. खासदार प्रणिती शिंदे यांचे जुने घर 'जाई-जुई' हे सोलापूरविजापूर महामार्गावर असून, ते याच प्रभागात येते. त्यामुळे हा प्रभाग काँग्रेससाठी प्रतिष्ठेचा मानला जात होता. या प्रभागात महाविकास आघाडी आणि भाजप यांच्यात चुरशीची लढत पाहायला मिळाली. महाविकास आघाडीच्या वतीने दीपाली शहा (काँग्रेस), अलका राठोड (उबाठा),



लक्ष्मण जाधव (उबाठा) आणि सुनीता रोटे (राशप) हे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात होते. मात्र मतमोजणीअंती भाजपच्या पॅनलने सर्व उमेदवारांचा पराभव करत एकतर्फी विजय मिळवला. खासदार प्रणिती शिंदे राहत असलेल्या प्रभागातच भाजपचा असा मोठा विजय झाल्याने काँग्रेस आणि महाविकास आघाडीला हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. या निकालामुळे आगामी राजकीय समीकरणांवरही परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. प्रभाग १९ भाजप विजयी १)कविता जंगम अ (ओबीसी महिला) २)व्यंकटेश कोंडी ब (ओबीसी) ३)कलावती गडगे क (सर्वसाधारण महिला) ४)बसवराज केंगनाळकर ड (सर्वसाधारण) प्रभाग २३ भाजप विजयी १)सत्यजित वाघमोडे-अ (अनुसूचित जाती) २)आरती वाकसे-ब (ओबीसी महिला) ३)ज्ञानेश्वरी देवकर-क (सर्वसाधारण महिला) ४)राजशेखर पाटील-ड (सर्वसाधारण).

# लातूरकरांनी निलंगेकरांनाही नाकारले

लातूर: प्रचंड गाजलेल्या अशा लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीचे निकाल आज जाहीर झाले. विधानसभा निवडणुकीत लातूरकरांनी जसे भाजपाच्या अर्चनाताई पाटभल चाकूरकर यांना नाकारले त्याप्रमाणे लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीत लातूरकरांनी माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वातील भाजपा पॅनललाही नाकारले आहे.



लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीत ७० नगरसेवक निवडून देण्यासाठी काल मतदान झाले. मताची ही टक्केवारी ६०.८८% इतकी होती. आज लातूर महिला तंत्रनिकेतन येथे मतमोजणी झाली तेंव्हा लातूरकरांनी आ. अमित देशमुख यांच्या नेतृत्वात काँग्रेसचे ४३ उमेदवार निवडून देत एक हाती सत्ता दिली आहे. त्यात बंचित बहजन आघाडीच्या ४ उमेदवारांचा समावेश आहे. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसने मोठा गाजावाजा केला होता. पालिकेत राष्ट्रवादीची सत्ता येईल असा दावा केला जात होता. मात्र या निवडणुकीत थोडक्या मताने माजी महापौर राष्ट्रवादी काँग्रेसचे विक्रांत गोजमगुंडे निवडून येऊन पालिकेत राष्ट्रवादी काँग्रेसने खातं उघडलं आहे. या निवडणुकीत शिवसेना एकनाथ शिंदे गट, शिवसेना उबाठा आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाला एकही जागा मिळविता आली नाही. एमआयएम लातूर पालिकेत खाते उघडेल अशी शक्यता होती त्यांना आणि अपक्षांनाही या निवडणुकीत खाते उघडता आले नाही.

दिग्गजांचा पराभव

या निवडणुकीत प्रभाग-६ मधून अर्चनाताई पाटील चाकूरकर यांची 'सावली' समजल्या जाणाऱ्या मिनाताई गायकवाड याचा प्रभाग ६ मधून पराभव झाला. याच प्रभागातून शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे उमेदवार माजी महापौर सुरेश पवार यांचा पराभव झाला. प्रभाग १७मधून माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांच्या पत्नी राष्ट्रवादी काँग्रेसकडून लढल्या. मात्र, बिराजदार यांच्या पत्नी राष्ट्रवादी काँग्रेसकडून लढल्या मात्र यात त्यांचाही पराभव झाला. माजी नगराध्यक्ष विक्रमसिंह चौहान यांनी भाजपात प्रवेश करून त्यांचे चिरंजीव धर्मेद्रसिंग चौहान हे प्रभाग ११ मधून भाजपा उमेदवार म्हणून पराभूत झाले. राज्य कृषीमुल्य आयोगाचे अध्यक्ष माजी आ. पाशा पटेल यांचा मुलगा प्रभाग २ मधून भाजपाचा उमेदवार म्हणून पराभूत झाला. माजी नगराध्यक्ष ॲड. व्यंकट बेद्रे यांचे चिरंजीव सुहास बेद्रे यांनी प्रभाग ९ मधून राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार म्हणून निवडणूक लढविली होती. त्यांचाही पराभव झाला आहे. माजी महापौर काँग्रेसच्या स्मिता खानापुरे या प्रभाग १५ मधून पराभूत झाल्या. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांच्या सुनबाई प्रियंका विश्वजीत गायकवाड या प्रभाग १२ मधून मोठ्या मतांनी पराभूत झाल्या. माजी खा. डॉ. सुनील गायकवाड यांचे भाच्चे प्रविणकुमार अंबुलगेकर हे प्रभाग अकरा मधून पराभूत झाले. राष्ट्रबादी शरद पवार गटाचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष राजा मणियार यांचा प्रभाग ९ मधून पराभव झाला. प्रभाग ८ मधून भाजपाचे ॲड. शैलेश गोजमगुंडे यांचा पराभव झाला.

काँग्रेस-वंचित युती यशस्वी

राज्यात काँग्रेसचे माजी मंत्री आ. अमित देशमुख यांनी बहुजन लातूर शहर महानगरपालिकेत काँग्रेस-वंचित आघाडीसोबत आघाडी केली. ती यशस्वी झाली. वंचित बहुजन आघाडीला पाच जागा देण्यात आल्या होत्या, त्यापैकी चार जागेवर विजयी होऊन वंचित विजयी झाली. माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांच्या सुनबाई तथा भाजपाचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या पत्नी आदिती अजित पाटील कव्हेकर या आपले दिर सुंदर पाटील कव्हेकर यांचा पराभव करून विजयी झाल्या, या निवडणुकीत काँग्रेसने प्रभाग ३, प्रभाग ८, प्रभाग ९, प्रभाग १०० प्रभाग १२ मध्ये ४ पैकी ४ ठिकाणी विजय मिळविला. प्रभाग १४ ते प्रभाग १८ मध्ये भाजपाने त्या प्रभागातील सर्व जागेवर विजय मिळविला.

# 'माझी आई, माझी मैत्रीण' किल्लारीत उपक्रम



**किल्लारी** - येथील शहीद भगतसिंग महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती, मकर संक्राती आणि भूगोल दिनाचे औचित्य साधून 'माझी आई, माझी मैत्रीण' हा उपक्रम साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भूगोल विभाग प्रमुख डॉ. दैवशाला नागदे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संग्राम मोरे, समाज प्रबोधन अकादमीचे सदस्य डॉ. डी. पी कांबळे, प्रा. पद्मजा कुलकर्णी, सुनंदा हांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्राचार्य डॉ. मोरे म्हणाले, आई आपल्या मुला-मुलींसाठी आयुष्यभर प्रचंड कष्ट घेते. रात्रंदिवस परिस्थितीशी झगडून मुला-मुलींच्या शिक्षणासाठी, भविष्यासाठी आयुष्य वेचते. त्याच आईची प्रत्येकानेच काळजी घेतली पाहिजे. वृध्दापकाळात आईला आधार दिला पाहिजे. आई-वडिलांना वृध्दाश्रमात सोडणे हा मानव जातीसाठी कलंक आहे, असेही ते म्हणाले. कार्यक्रमास प्रा. शुभांगी उस्तुरे, नेहा धानुरे, प्रा. निकिता धानुरे, प्रा. शबाना शेख, प्रा. प्रिया पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. प्रतीक्षा मोरे, तर प्रास्ताविक प्रा. पद्मजा कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमास माता, शिक्षक, प्राध्यापक व विद्यार्थी, उपस्थित होते.

# औशाच्या उपनगराध्यक्षपदी डॉ. अफसर शेख बिनविरोध

**औसा-** औसा नगरपालिकेत लोकनियुक्त नगराध्यक्षा परवीन शेख यांच्यानंतर आता उपनगराध्यक्षपदी त्यांचे बंधू आणि राष्ट्रवादीचे गटनेते डॉ. अफसर शेख यांची बिनविरोध निवड झाली आहे. निवडीनंतर कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिषबाजी आणि मिठाई वाटप करून जल्लोष केला. गुरुवारी डॉ. शेख यांनी पदभार स्वीकारला.

मंगळवारी पालिकेच्या सभागृहात पार पडलेल्या विशेष सभेत उपनगराध्यक्ष तथा स्वीकृत सदस्यांची निवड प्रक्रिया पार पडली. यात राष्ट्रवादीचे गटनेते डॉ. अफसर शेख यांची उपनगराध्यक्षपदी, तर हमीद सय्यद व जुनेद सय्यद यांची स्वीकृत सदस्य म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. ही निवड पीठासीन अधिकारी परवीन शेख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी पालिकेच्यावतीने उपनगराध्यक्षासह स्वीकृत सदस्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याधिकारी मंगेश शिंदे, नगरसेवक जावेद शेख, मौलाना कलिमुल्लाह सय्यद, गोविंद जाधव, अविनाश टिके, कृष्णा सावळकर, सुनील मिटकरी, आकाश उटगे, पीयूष म्हेत्रे, कीर्ती कांबळे, आनंद बनसोडे, ऐश्वर्या राचट्टे, मालनबी पटेल,



हंसा सय्यद, सबीहा शेख, मेहरुन्निसा शेख, शांताबाई कसबे, शिल्पा कुलकर्णी, अश्विनी स्वामी, असिफुन्निसा मुल्ला, हाफिजा बेगम कुरेशी, रफिक मुंगळे, अतिखा सय्यद, राष्ट्रवादीचे विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष सुलेमान शेख, दत्तात्रय कोळपे, सुनील गायकवाड, अमर रेड्डे, संगमेश्वर उटगे आदी उपस्थित होते. निवडीनंतर डॉ. अफसर शेख म्हणाले, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शहराचा समतोल विकास साधण्यास आमचे प्राधान्य असेल. स्वच्छतेच्या बाबतीत औसा शहराचा लौकिक आम्ही यापूर्वीच देशपातळीवर नेला आहे. महिला व सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देणे, शहरातील आरोग्य, शिक्षण व क्रीडा क्षेत्राचा विस्तार करण्यावर आमचा भर राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# सीआरपीएफ जवानांचा दीक्षांत समारोह, गौरव

लातूर : ४४ आठवड्यांचे कठीण आणि शिस्तबद्ध प्रशिक्षण पूर्ण केलेल्या केंद्रीय राखीव पोलिस बलातील १ हजार १६६ जवानांचा दीक्षांत सोहळा सोमवारी येथील सीआरपीएफच्या रिक्रूट प्रशिक्षण केंद्रात उत्साहात पार पडला. यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जवानांना गौरविण्यात आले.

या सोहळ्यास सीआरपीएफच्या मध्य झोन, कोलकत्ता येथील विशेष महानिदेशक अमित कुमार यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी चाकूरच्या बीएसएफचे पोलिस महानिरीक्षक विनीत कुमार, पोलिस उपमहानिरीक्षक तथा प्राचार्य अमिरुल हसन अन्सारी, कमांडंट वेद प्रकाश, मुख्य प्रशिक्षण अधिकारी पारस नाथ, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलिस अधीक्षक अमोल तांबे आदी उपस्थित होते.

विशेष महानिदेशक अमित कुमार म्हणाले, आता हे प्रशिक्षित जवान देशातील विविध संवेदनशील व अतिसंवेदनशील भागांमध्ये तैनात होऊन अंतर्गत सुरक्षा, दहशतवाद व नक्षलवाद विरोधी तसेच परताया, तसेच नसार्थक आपली सेवा बजावतील. सीआरपीएफ हे देशाच्या अंतर्गत सुरक्षेचे मजबूत आधारस्तंभ असून, राष्ट्रसेवेत सदैव अग्रणी भूमिका बजावत आहेत.

**युध्द कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन...**

या परेडनंतर प्रशिक्षक व प्रशिक्षणार्थ्यांनी शारीरिक क्षमता, सामूहिक समन्वय व युद्ध कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन करीत बाइक स्टंट, मल्लखांब, झुंबा, रायफल ड्रिल आदींचे नेत्रदीपक सादरीकरण केले. उपस्थितांनी टाळ्यांचा कडकडाट कौतुक केले.

**सेवा, त्यागाची प्रतिज्ञा**

सीआरपीएफचे विशेष महानिदेशक अमित कुमार यांनी परेडची सलामी स्वीकारली. जवानांना शिस्त, निष्ठा, कर्तव्य तत्परता आणि गौरवशाली परंपरांचे सदैव पालन करावे, असे आवाहन केले. या प्रेरणादायी शपथविधी क्षणी, सैनिकांनी राष्ट्रासाठी प्रामाणिकपणा, सेवा, धैर्य आणि त्यागाची प्रतिज्ञा केली.

मूलभूत प्रशिक्षणाच्या विविध पैलूंमध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल हितेश, अर्जुन, विमल सिंह, सीमा नारायणराव, हरेंद्र सिंह, प्रवीण बर्ला, ए. के. पृष्टी, रामचंद्र पांडा, नीलेश पवार यांना पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

# अहमदपूर उपनगराध्यक्षपदी अय्याज शेख

**अहमदपूर,** - अहमदपूर नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा सोमवारी होऊन उपनगराध्यक्षपदी अय्याज शेख यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच तीन स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्यात आली.

नगराध्यक्ष ॲड. स्वप्नील व्हत्ते यांच्या अध्यक्षतेखाली ही विशेष सभा झाली. उपनगराध्यक्ष पदासाठी अय्याज शेख यांचा एकमेव अर्ज दाखल झाला. तो छाननीत वैध ठरल्यानंतर पीठासीन अधिकारी ॲड. व्हत्ते यांनी अय्याज शेख यांची उपनगराध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. यावेळी जनविकास आघाडीचे लक्ष्मण अलगुले, राष्ट्रवादीचे युसुफ सय्यद, सुप्रिया भालेराव यांची स्वीकृत सदस्य म्हणून निवड जाहीर करण्यात आली. यावेळी २६ नगरसेवक उपस्थित होते.

# नाथ संस्थानच्या माघवारी दिंडीचे मंगळवारी प्रस्थान

औसा : मराठवाड्यातील प्राचीन, श्रद्धेची व परंपरेची साक्ष देणारी सच्चिदानंद सद्गुरु श्री. वीरनाथ-मल्लनाथ महाराज संस्थान, श्रीक्षेत्र औसा यांची माघ पायीवारी दिंडी व पालखी सोहळा मंगळवार दि. २० जानेवारी रोजी दुपारी २ वाजता श्रीक्षेत्र गोपाळपूर येथून श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. पिठाधिपती सद्गुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या अधिपत्याखाली व सद्गुरु गहीनीनाथ महाराज औसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडणार आहे.

हजारो वारकरी, शेकडो टाळकरी, झेंडेकरी व विणेकरी यांच्या सहभागाने निघणाऱ्या य पालखी दिंडीचा पहिला मुक्काम बोरफळ येथे असेल. पुढील प्रवासात उजनी, केशेगाव, धारूर, तुळजापूर, शेळगाव, नरखेड, सारोळे आदी गावांत मुक्काम करत दिंडी मंगळवार दि. २७ जानेवारी रोजी चंद्रभागेच्या पावन तीरावर पोहोचेल. माघ दशमी ते त्रयोदशीदरम्यान औसेकर महाराजांचा भव्य फड उभारून काकडा आरती, भजन, चक्रीभजन, कीर्तन व प्रवचनातून अखंड नामसंकिर्तनाचा सोहळा रंगणार आहे.

शनिवार दि. ३१ जानेवारी रोजी श्री. विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात पिठाधिपती सद्गुरु गुरुबाबा महाराज औसेकर यांचे प्रासादिक चक्रीभजन होणार आहे. ही दिंडी १ फेब्रुवारी रोजी परतीच्या प्रवासास निघून रविवार दि. ८ फेब्रुवारी रोजी औशात गोपाळकाला व धार्मिक कार्यक्रमांनी सांगता होईल. या माघवारी सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन नाथ संस्थानच्यावतीने करण्यात आले आहे.

# श्री विकास वाचनालयाचा ५५ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा



औसा प्रतिनिधी : - औसा येथील विकास वाचनालयाचा दि १४ जानेवारी २०२६ बुधवार रोजी ५५ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला असून ग्रंथालयात नवनवीन पुस्तकांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन महाराष्ट्र शासनाने व महाराष्ट्र शासनाने औसा तालुक्यातील व्यक्तीला डॉ एस आर रंगनाथन, उत्कृष्ट कार्यकर्ता व उत्कृष्ट सेवक ग्रंथमित्र पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. धनंजय पवार (हसाळा) राज्यस्तरीय कार्यकर्ता ग्रंथमित्र पुरस्कार व सूर्यकांत जाधव ग्रंथपाल अलमला यांना विभाग स्तरीय ग्रंथमित्र सेवक पुरस्कार या दोघांचा सत्कार विकास वाचनालयाचे वतीने करण्यात आला. प्रथम ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस आर रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे सत्कार करण्यात आले. या ग्रंथालयात ग्रंथपाल म्हणून काम केलेले शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक अभिमन्यू जंगले यांचा व कार्यक्रमाचे प्रमुख प्रा. युवराज हलकुडे तसेच विकास वाचनालयाचे अध्यक्ष धनंजय कोपरे यांचा वाचनालयाच्या वतीने नवीन वर्षाची डायरी देऊन सत्कार करण्यात आला. गेली ५४ वर्ष या वाचनालयाने शहरातील अनेक प्रशासकीय अधिकारी घडविले, त्यात तहसीलदार, वकील, प्राध्यापक, इंजिनिअर अशा व्यक्तींना घडवण्यात खूप मोठा वाटा आहे. या ग्रंथालयात १८ दैनिके, १५० मासिके, ३५११७ ग्रंथ संख्या आहे. या सर्वांचा लाभ शहरातील वाचक घेतात. या वाचनालयाचे सभासद संख्या ५३० आहे. श्री विकास वाचनालयाची सुरुवात दि. १४ जानेवारी १९७१ रोजी शहरातील निवडक मित्रांनी एकत्र येऊन केली. कै. ड. त्रिंबकदास झंवर (काका), कै. न्याहळकर, जगदीश चव्हाण, जयराज उटगे, धनंजय कोपरे, विजयकुमार वैजवाडे, बसवराज मुर्गे या सात लोकांनी या वाचनालयाची सुरुवात केली. या वाचनालयाचे पहिले ग्रंथपाल राजाभाऊ पाठक त्यानंतर मारुती चिरके यांनी आपले पूर्ण आयुष्य या ग्रंथालयासाठी आयुष्य दिले. त्यांनी लातूर, उस्मानाबाद, नांदेड या भागात अनेक ग्रंथालये उभी केली. त्यामुळे आज हजारो कर्मचारी त्याच्यावर जगत आहेत. औसा तालुक्यातील सर्व ग्रंथालयांना मदत व चांगला वाचक घडण्याचे काम या ग्रंथालयाने केले आहे. हे ग्रंथालय गेले कित्येक वर्ष शहरात घरोघरी जाऊन सायकलवर पुस्तके देण्याची कामे केली आहेत. त्यामुळे वाचन चळवळ जिवंत ठेवण्यात काम केले आहे, असे प्रा. युवराज हालकुडे यांनी आपल्या भाषणात व्यक्त केले आहे, व हे ग्रंथालय येत्या एक ते दोन वर्षात स्वतःच्या इमारतीत जाईल असे आश्वासन ग्रंथालयाचे अध्यक्ष धनंजय कोपरे यांनी व्यक्त केले. यावेळी या कार्यक्रमासाठी वाचनालयाच्या सचिव रविराज कोपरे, उपाध्यक्ष निलेश उटगे, वैभव कुर्ले, धनंजय वैजवाडे, देविदास शेटकार, प्रा. पी सी भांगरे, वसंत भोंडे व वाचक वर्ग व वाचनालयाचे ग्रंथपाल विकास चिरके, सहाय्यक ग्रंथपाल गिरीधर जंगाले, सेवक धनंजय कठारे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गिरीधर जंगाले यांनी केले, तर आभार विकास चिरके यांनी मानले.

# रेणापूर नगरपंचायत विषय समिती सभापतींच्या बिनविरोध निवडी

रेणापूर, - रेणापूर नगरपंचायतीच्या स्थायी समिती व विषय समित्यांची गुरुवारी दि. १५ जानेवारी रोजी बिनविरोध निवड करण्यात आली. स्थायी समितीचे सभापतीपद हे पदसिध्द असल्याने नगराध्यक्षा शोभाताई अकनगिरे हे कायम राहात सार्वजनिक बांधकाम समितीच्या सभापतीपदी सुमनताई श्रीकृष्ण मोटेगावकर यांच्यासह चार विषय समितीच्या सभापती सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

गुरुवारी (दि. १५) जानेवारी रोजी दुपारी ४ वाजता रेणापुर नगरपंचायतच्या सभागृहात पिठासीन अधिकारी प्रशांत थोरात यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा घेण्यात आली. या सभेत सहापैकी स्थायी समितीचे सभापती पदसिध्द असल्याने पाच सभापती पदासाठी पाच नगरसेवकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. या व्यतिरिक्त कोणाचाही अर्ज आला नसल्याने सभापती पदाच्या निवडी बिनविरोध करण्यात आल्या.

स्थायी समितीचे सभापतीपद पदसिध्द असल्याने लोक नियुक्त नगराध्यक्षा शोभाताई आकनगिरे या कायम ठेवत स्वच्छता, वैद्यकीय व आरोग्य समितीच्या सभापतीपदी उपनगरध्यक्षा खैरुनिसा मारूफ अत्तार, सार्वजनिक बांधकाम समिती सभापतीपदी सुमनताई श्रीकृष्ण मोटेगावकर, पाणीपुरवठा आणि जलनिस्सारण समितीच्या सभापतीपदी दत्ता त्रिंबक सरवदे, महिला व बालकल्याण सभापतीपदी ज्योतीताई विजय चव्हाण, तर उपसभापतीपदी धरती महेश गाडे या भाजपाच्या नगरसेवकाची तर नियोजन आणि विकास समितीच्या सभापतीपदी काँग्रेस पक्षाच्या नगरसेविका सुजाताताई बाबू सौदागर यांची बिनविरोध निवड झाल्याचे पिठासीन अधिकारी थोरात यांनी घोषीत केले. यावेळी मुख्याधिकारी रोहित आरबोळे, नगर पंचायतचे अधिकारी प्रदीप पाटील, ज्ञानदेव दहिफळे, अमोल बाजुळगे यांच्यासह भाजपा गटनेते अभिषेक अकनगिरे, काँग्रेसचे गटनेते गजेंद्र चव्हाण व सर्व नगरसेवक उपस्थित होते. नवनिर्वाचित सभापती यांचे नगरसेवक व कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.